**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDXXXIV) 434-C

ISSN : 2278-9308
November, 2023

# संस्कृत साहित्यातील पर्यावरण विषयक विचार

**प्रा.डॉ.वैशाली पांडे (गोडबोले)**

श्रीमती व.ना.महिला महाविद्यालय, पुसद ९९२३८७९७४३

सारांश –

पर्यावरण संरक्षणाची कल्पना मानव जातीच्या इतिहासा इतकीच प्राचीन आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीत पर्यावरण संरक्षणाला अतिशय प्राधान्य होते. हजारो वर्षापूर्वी मानवी जीवनाच्या कल्याणासाठी नगराच्या कोलाहलापासून दूर, निसर्गाच्या सान्निध्यात, शांत वातावरणात आपला आश्रम बनऊन निवास केला. पर्यावरण रक्षणासाठी मानवाचा सहयोग अत्यावश्यक आहे. प्राचीन ऋषिमुनींनी वृक्षांना, दगडांना, नद्या, पर्वतांना देव मानले. त्यांचा सामान्य जनमानसांशी नित्याचा संबंध जोडला. प्राचीन भारतीय परंपरेच्या अनुषंगाने निर्माण झालेले संस्कृत वाङ्मय याची साक्ष देते की चराचर सृष्टी ही मानवाच्या दैनंदिनजीवनाचा अविभाज्य भाग होती. त्यामुळे या वाङ्मयाचे अनुशीलन आजच्या काळात करणे अगत्याचे वाटते. पर्यावरण संरक्षणाचे शिक्षण सुरूवातीच्या काळातच मिळणे गरजेचे आहे. पर्यावरणाने प्रदान केलेल्या सुरक्षा कवचात आपण सुखनैव निवास करतो. त्या सुरक्षा कवचाचा छेद आपल्याच अस्तित्वाला घातक ठरणार आहे ही जाण निर्माण होणे अत्यावश्यक वाटते. ती जाण संस्कृतवाङ्मयाने प्रकर्षाने जागृत ठेवल्याचे त्या वाङ्मयाच्या अध्ययनाने लक्षात येते. एतदर्थ वैदिक काळापासून वाङ्मयात पर्यावरणीय जाणीवा कशा जागृत होत्या याचा आढावा येथे घेतला आहे.

प्रस्तावना–

पाश्चात्य देशांच्या औद्योगिकरणाच्या प्रवृत्तीमधून निसर्गावर अपरिहार्यपणे काही दुष्परिणाम घडून आले. परिणामी पृथ्वीचा जैविक, भौगोलिक समतोल बिघडला. त्याचे अत्यंत गंभीर परिणाम मानवी जीवनावर झाले.

मानव आणि पर्यावरण परस्पराश्रयी आहेत. मानव हा जीवसृष्टीतील प्रगत बुद्धिमान प्राणी असल्याने त्याने नेहमीच स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी निसर्गाला वेठीशी धरले आहे. स्वतःचे जीवन सुखी करण्यासाठी माणसाने निसर्गात अवाजवी हस्तक्षेप केला. नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार गैरवापर केल्याने त्याची परिणती पर्यावरणाच्या अवनतीत झाली. नैसर्गिक असंतुलन निर्माण झाल्याने ग्लोबल वॉर्मिंग, प्रदूषण, कोरोना सारखे भयानक आजार अशा समस्या मानवापुढे उभ्या राहिल्या. पर्यावरण प्रदूषण सर्वात अधिक भयावह आहे. ही आज संपूर्ण विश्वाची समस्या आहे. संस्कृत भाषेत एक म्हण प्रसिद्ध आहे – 'प्रक्षालनाद्‌ हि पङ्कस्य दूरादस्पर्शनं वरम्।' म्हणजे 'पाय चिखलाने भरून धुण्यापेक्षा चिखलाला स्पर्श न करणे कधीही चांगले. याच धर्तीवर असे म्हणता येईल की, पर्यावरणाची समस्या निर्माण होऊन त्यावर उपाययोजना करण्यापेक्षा समस्या निर्माण न होऊ देणे महत्त्वाचे! इतर काही संस्कृतीत देवाने मानवाच्या उपभोगासाठीच ही पृथ्वी निर्माण केली असे मानले जाते. पण भारतीय संस्कृती मात्र मानवाला निसर्गाचा एक भागच मानते.

संस्कृती आणि पर्यावरण यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. संस्कृती मानवाच्या हृदयात परोपकार, समाजसेवा, सहयोग, सहानुभूती यांचे बीजारोपण करते, तर पर्यावरण मानवाला बाह्यरूपाने सशक्त बनविते. भारतीय संस्कृतीची पर्यावरण संरक्षणात अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक भूमिका आहे. मानव आणि निसर्ग यांच्यात अतूट नाते आहे. म्हणूनच शास्त्रात वृक्ष, पर्वत, नद्या, झरे पशुपक्षी, सरोवरे इतकेच नव्हे तर दगडांचीही पूजा केली आहे.

प्राचीनभारतीय संस्कृती आणि तदनुषंगाने निर्माण झालेले वाङ्मय यांचे अवलोकन केले असता प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट अशी की, प्राचीन भारतीय निसर्गानुकूल होते. निसर्गाला देव मानून त्यातील शक्तितत्त्वांची ते पूजा करीत होते. इतकेच नव्हे तर चराचर सृष्टी त्यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक होती.

परि + आवरण मिळून पर्यावरण शब्द बनला आहे. 'परि' या उपसर्गाचा अर्थ परितः चारही बाजूंना, आवरण अर्थात आच्छादन। 'परितः आवृणोति आच्छादयति तत् पर्यावरणम्' अशी

पर्यावरणाची व्याख्या यजुर्वेदात आली आहे. आपल्या चारही बाजूंनी आपल्याला उपकारक असलेले वायू, जल, वन, पर्वत नद्या या सर्वांचे आवरण यांचा समावेश पर्यावरणत होतो.

वैदिक संस्कृत वाङ्मयापासून ते अर्वाचीन संस्कृत साहित्यापर्यंत सर्वच कवींनी आपल्या साहित्यकृतीमध्ये निसर्गवर्णनाला अग्रक्रमाने प्राधान्य दिले आहे. कवीचे निसर्गाशी जेवढे तादात्म्य असते तेवढे सामान्य मनुष्याचे असत नाही. कवीच्या अंगी असलेली नवनवोन्मेषशालिनीप्रतिभा त्याचे निसर्गाशी जणू नाते घडवून आणते. साहित्यकृतींचे निसर्गाशी असलेले तादाम्य मानवाला निसर्गाचे व पर्यायाने स्वत:च्या जीवनाचे संरक्षण करण्यास प्रेरित करते. वेदांबरोबरच उपनिषदे, पुराण वाङ्मय लौकिक संस्कृत वाङ्मयातही नदया, पर्वत, उपवने, वृक्ष, वेलींचे वर्णन विपुल प्रमाणात आढळते. मानवाने संस्कृत साहित्याचा आणि आयुर्वेदाचा अभ्यास करून पर्यावरणाची अनुपम देण असलेल्या प्राकृतिक वनस्पतींचा लाभ घेऊन स्वत:चे जीवन रोगमुक्त बनविले. हवा, पाणी या सारख्या नैसर्गिक स्रोतांची निर्मिती मानवाला करता येत नाही, हे सर्वविदितच आहे. म्हणून निसर्गदत्त असलेल्या या गोष्टींचा संतुलित वापर करणे अतिशय आवश्यक आहे. साहित्याच्या अनुशीलातून, ही जागृती फार मोठया प्रमाणात संभव होऊ शकते. एतदर्श साहित्यकृतीतील पर्यावरणीय संदर्भाचा येथे ओझरता आढावा घेतला आहे.

**विषयविवरण –**

ऋग्वेदात आकाशाला पिता आणि पृथ्वीला माता असे संबोधले आहे. 'मा हिंसी पुरूषं जगत्' म्हणजे स्वत:च्या स्वार्थासाठी कोणत्याही प्राण्याची हत्या करू नये अशी वेदांची आज्ञा आहे. ऋग्वेदात 'वनानि न: प्रजाहीतानि। म्हणजे वने प्रजाहितासाठी असल्याने त्यांची तोड न करण्याविषयी सांगितले आहे.

'नु वायो: अमृतं वि दस्येत्।' या ऋचेत वायूमधील अमृत म्हणजे ऑक्सिजनचे प्रमाण कमी न होऊ देण्याविषयी प्रार्थना आहे.

ऋग्वेदातील एका सुक्तातविविध घटकातील विष म्हणजे प्रदूषण हरण करण्याविषयी प्रार्थना केली आहे.

'आप ओषधीरूत नोऽवन्तुद्यौर्वनागिरयोवृक्षकेशा:।।'

म्हणजेच जल, वनस्पती, नभोमंडल, वन, वृक्ष आणि झाडांनी व्यापलेले पर्वत आमचे रक्षण करोत अशी प्रार्थना ऋग्वेदात आली आहे. पर्यावरणीय तत्त्वांनाच देवता मानून त्यांची प्रार्थना येथे केलेली दिसून येते. तसेच –

'द्यावा क्षामा सिन्धवश्च स्वर्गूता:।

गव्यं यव्यं यन्तो दीर्घहिषं वरमरूण्यो वरन्त:।।'

आकाश, पृथ्वी प्रवाहयुक्त नदया, मला दुग्धादि अन्न आणि दीर्घ जीवन प्रदान करोत. ही उषा श्रेष्ठ वस्तू प्रदान करो. ही प्रार्थना ही रनसर्ग तत्त्वांना उद्देशूनच केलेली दिसते.

वेदांमध्ये नदयांना अत्यंत श्रेष्ठ स्थान दिले आहे. जलस्रोत जीवनदायी असल्याने ऋग्वेदकालीन ऋषी सरस्वतीला 'अम्बितमे नदीतमे देवितमे सरस्वति' असे आदराने संबोधतात.

'सर्वा नद्यो अशिमिदा भवन्तु। सर्व नदयांचे पाणी आरोग्यदायी होवो' अशी ऋग्वेदात प्रार्थना आली आहे. तसेच 'इयन्मधं सरस्वती वा सुभगा ददिर्वसु।।' सुन्दरी सरस्वतीच समृद्धी आणि विपुल धन अर्पण करते असे वर्णन आले आहे.

इदमाप: प्र वहत् यत् किंच दुरितं मयि।

यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेपउतानृतम्।।

वैदिक साहित्यात एकतीस नदयांचा उल्लेख आला आहे. त्यातील पंचवीस नदयांचा उल्लेख एकटया ऋग्वेदात आहे.

जलदेवता माझी पापे, वाईटगोष्टी, असत्यभाषण, शाप दूर करो अशी प्रार्थना करून जलाचे अमंगलाचा नाश करण्याचे सामर्थ्य प्रदर्शित केले आहे.

यजुर्वेदातही अशा पर्यावरणीय तत्वांना ऋषिमुनींनी प्रार्थना केल्याचे दिसते. ते प्रार्थना करतात. 'श्वात्रा पीता भवत यूयमापो।'

अस्माकमन्तरूदरे सुशेवा:।

ता अस्मभ्यमयक्ष्मा अनमीवा



CamScanner

अनागस स्वदन्तु देवीरमृता ऋतावृधा।।

याचा अर्थ असा की आम्ही प्राशन केलेले जल आम्हाला बलदायक ठरावे. ते आमच्या पोटात सुखद व्हावे. त्यामुळे रोग न होवोत. ते आरोग्यवर्धक, निष्पाप, सत्याची स्थापना करणारे, अमृत आणि स्वादिष्ट असो. निसर्गाशी मानवाचे असलेले तादम्य या वर्णनातून प्रकर्षाने जाणवते –

'सुमित्रिया न आप ओषधय: सन्तु।।'

जल आणि वनस्पती आम्हाला प्रिय होवोत. अशी सदिच्छा व्यक्त केली आहे.

पञ्चनद्यः सरस्वतीमपि यान्ति सस्रोतसः।

सरस्वती तु पञ्चधाऽसौ देशेऽभवत् सरित्।।

यजुर्वेदात म्हटले आहे की, पाच नद्या वहात येऊन सरस्वतीला मिळतात. सरस्वती शाखा प्रशाखांसह राष्ट्रामध्ये ज्ञानाचा विस्तार करो. नैसर्गिकतत्वे आपल्या कल्याणकारित्वासाठी आहेत ही भावना वेदकालीनांच्या मनात रुजलेली होती.

अथर्ववेदात ऋषी म्हणतोकी, 'माता भूमि: पुत्रोऽहं पृथिव्या:' पृथ्वीला त्याने मातृत्व बहाल केले आहे. तिचे पालन पोषण हे त्याचे आद्य कर्तव्य हे ओघाने आलेच! पृथ्वीचे रक्षण हे पुत्रकर्तव्य मानून होत होते.

'सा नो भूमिस्त्विषिं बलं राष्ट्रे दधतूत्तमे।'

ती भूमी आम्हाला उत्तमराष्ट्र, शक्ती, प्रभा प्रदान करो अशी कामना केली आहे.

अथर्ववेदाच्या द्वादशकांडात 'भूमिवर्णन' आले आहे. त्याचे अवलोकन केले तर वेदकालीन पर्यावरण विषयक जागृतीची स्पष्ट कल्पना येते. ऋषी भूमीची प्रार्थना करताना म्हणतात की, सागर–सरितांचे विपुल जल, शेतीचे उत्पन्न झालेले उत्कृष्ट धान्य तसेच सजीव प्राणी यांनी समृद्ध असणारी ही भूमिदेवी आम्हास विपुल अन्न प्रदान करो.'

चारही दिशांना विस्तारलेली, तसेच नानाविध प्राण्यांना धारण करणारी ही भूमिदेवी आमच्या धेन्वादि पशुंना विपुल अन्न प्रदान करो. हे पृथ्वीदेवी, तुझ्या ठायीचे हिमयुक्त पर्वत आणि अरण्ये आम्हास सुखदायक होवोत. पोषक, कृषियुक्त, वृक्षसंपन्न, अनेकरूपधारिणी आणि स्थिर अशा सुरक्षित पृथ्वीवर आम्हास अपमृत्युरहित जीवन प्राप्त होवो.

अथर्ववेदात 'अप्स्वन्तरममृतमप्सु भेषजम्' म्हणजे जलामध्ये अमृत आहे. जलामध्ये औषध आहे असे म्हटले आहे.

शतपथ ब्राह्मणात देखील 'अमृतं व आप:' असे म्हणून पाण्याला अमृत ठरविले आहे. त्यामुळे जलप्रदूषण करणे महापाप समजले जात असे.

ईशावास्योपनिषदाच्या आरंभी आलेला –

ॐ पूर्णमिदं पूर्णमदः पूर्णात्पूर्णमुदच्यते।

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

हा शांतिपाठ अतिशय अर्थगर्भ आहे. सच्चिदानंदस्वरूप परब्रह्म सर्व प्रकारे पूर्ण आहे आणि हे दृश्य जगत् सुद्धा पूर्णच आहे. जरी पूर्ण परब्रह्मातून हे पूर्णजगत् व्यक्त स्थितीत आलेले असले तरीही या पूर्णब्रह्म्याच्या पूर्ण स्थितीला बाधा येत नाही. ते आहे तसेच पूर्ण राहते. याच उपनिषदाच्या पहिल्या मंत्रात असे कथन केले आहे की,

ईशावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।

तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्यस्विद् धनम्।।

याचा आशय असा आहे की, 'या जगात जे काही उत्पन्न होणारे व विलयास जाणारे आहे ते सर्व ईशतत्त्वाचा निवास असलेले आहे. त्या ईशतत्त्वाच्या साक्षीने त्यागबुद्धी ठेवून भोग्य वस्तूंचा उपभोग घे. ही सृष्टीपरंपरा कोणा एकाच्या मालकीची नाही. म्हणून गिधाडासारखे काहीही हव्यासाने घेऊ नकोस हा उपदेश अनंत हातांनी सृष्टिसंपदेचा उपभोग घेणाऱ्या सर्व मानवांना अंतर्मुख करणारा आहे.

यस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति।

सर्वभूतेषु चात्मानं ततो न विजिगुप्सते।।

याचा आशय असा की, जो आपल्यासारखे सर्व प्राणिमात्रांना आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये आपल्याला पाहतो तो कोणाचाही तिरस्कार करीत नाही. पर्यावरण जोपासनेचा मूलमंत्र असावा असा



CamScanner

हा मंत्र आहे. सर्व चराचर सृष्टीशी ज्याचे जीवन तादात्म्य पावते, तिच्याशी जो एकरूप होतो. असा सुसंस्कृत व्यक्ती स्वतःच्या अस्तित्वाबरोबरच चराचरसृष्टीचे अस्तित्वही सोबत घेऊन जगत असतो.

पुराणानी पूर्तधर्म म्हणजे तलाव, विहिरी, धर्मशाळा, अन्नछत्रे इ. निर्माण करून परोपकार करणे पुण्यकारक असल्याचे सांगितले आहे. वृक्षायुर्वेदाची चर्चा पुराणे करतात. ब्रह्मांडरचना आणि भूगोल हा पुराणाचा एक महत्त्वाचा विषय आहे.

पदमपुराणात 'दशपुत्रसमोद्रुम ।' म्हणजे एकझाड दहा अपत्याप्रमाणे मानावे असे सांगितले आहे. तर स्कन्दपुराणात म्हटले आहे की,

अश्वत्थमेकं पिचुमन्दमेकं न्यग्रोधमेकं दशचिंचिणीकम्।
कपित्थबिल्वामलमलकत्रयं च पञ्चाम्रवापी नरकं न पश्यते।।

याचाच अर्थ असा की, वड, पिंपळ, कडुलिंब, चिंच, बेल, आंबा, कवठ, अशोक ही झाडे लावून त्यांचे संगोपन करणाऱ्याला नरकयातना होत नाहीत. वृक्षारोपण व संगोपनाचे फळ सांगून मानवाला त्यासाठी प्रवृत्त केले आहे. वरील सर्व वृक्ष मोठे, सावली देणारे, फळे देणारे वृक्ष आहेत हे विशेष!

वामनपुराणात असा श्लोक आला आहे की,
"पृथ्वी सगन्धा सरसास्तथापः स्पर्शीच वायुर्ज्वलितच तेजः।
नभः सशब्द महता सहैव कुर्वन्तु सर्वे ममसुप्रभातम्।।" (१४.२६)

सुप्रभातच पर्यावरणाच्या सर्व तत्त्वांना स्मरून होत होती असे दिसते. त्यामुळे पर्यावरण चिंतन हा वेगळ्याने चिंतनाचा विषय नसून दैनंदिन जीवनाचा तो अविभाज्य भाग असल्याचे लक्षात येते. भविष्यपुराणात सृष्टीची उत्पत्ती, ब्रम्हांडाचे वर्णन, गृहस्थधर्म, सूर्योपासना, यज्ञमहिमा, यज्ञप्रक्रिया इत्यादी बरोबरच वृक्षहात्म्य 'वर्णिले आहे. भविष्य पुराणाच्या द्वितीय मध्यम पर्वात वृक्षमहिमा प्रामुख्याने वर्णिला आहे. या पर्वाच्या दहाव्या अध्यायात सांगितले आहे. की झाडे लावण्यास मूळनक्षत्र प्रशस्त मानले आहे. कोणती झाडे कोठे लावावीत व लावू नयेत. याचाही विवेक भविष्यपुराणत दिसून येतो. दाट सावलीची झाडे, पुष्प फळांची झाडे चौरस्त्यावर, मार्गावर लावाणाऱ्याचे पितृगण पापातून मुक्त होतात. वृक्षारोपण केल्याने मनुष्याचे पूर्व आणि पर पितर पापमुक्त होऊन स्वर्गात जातात म्हणून वृक्षारोपण करावे असे भविष्यपुराण सांगते. वृक्ष पुत्रहीनाला पुत्रत्व देतात. मुक्ती प्राप्त करण्यासाठी हजारो, लाखो, करोडो, शक्य तेवढे वृक्ष लावावेत असे येथे सांगितले आहे. तसेच निरनिराळे वृक्ष लावल्याने कोणत्या फलाची प्राप्ती होते. याविषयी भविष्य पुराण सांगते, पिंपळाचा वृक्ष लावल्याने धन प्राप्ती होते. अशोकाने शोकनाश, प्लक्षवृक्षाने, ब्रह्मत्वप्राप्ती, बेलाने आयुष्यप्राप्ती, जांभुळाने धनप्राप्ती, तेंदूवृक्षाने कुलवृद्धी, डाळींबाने कामिनीची प्राप्ती, बकुळ आणि अशोकाने पापमुक्त, बल आणि बुद्धीची प्राप्ती होते. आवळ्यामुळे स्वर्गप्राप्ती, वडामुळे मोक्षप्राप्ती, आंब्यामुळे इच्छापूर्ती, सुपारीने सिद्धी, कदम्बापासून विपुल कीर्ती, जिवन्ती ने रोगशांती, केशराने शत्रुनाश, श्वेतवटाने धनप्राप्ती, शिंशपा, अर्जुन, जयंती, कनेर, श्रीवृक्ष, किंशुक लावल्याने ब्रह्मत्वाची प्राप्ती आणि हजार वृक्ष लावण्यास विष्णुपदाची प्राप्ती होते असेही भविष्यपुराण सांगते.

वृक्षारोपणाचा नुसता महिमा सांगून भविष्यपुराण थांबत नाही तर वृक्षांचा नाश करणाऱ्यांना कशी वाईट फळे मिळतात ते ही कथन केले आहे. पिंपळ, वट, श्रीवृक्ष लेशमात्र जरी कापले तरी मनुष्य ब्रह्मघाती ठरतो. वृक्ष मूळासकट तोडले तर कुळाचा नाश होतो. वृक्षाचा छेद करणारा मुका होतो. त्याला शेकडो शारीरिक, मानसिक कष्ट होतात. इतकी विलक्षण पर्यावरण विषयक जागरूकता भविष्यपुराणात आढळते. '

माणूस आणि निसर्ग यांच्यातील परस्परसंवाद 'रामायण' या आदिकाव्यात दिसून येतो. आदिकवींच्या तोंडून बाहेर पडलेला. रामायणाच्या रचनेनचे मूळ असलेला श्लोकच त्यांचे पर्यावरणविषयक प्रेम प्रकट करतो. व्याधाच्या बाणाने विद्ध झालेल्या क्रौञ्चमिथुनापैकी एकाला प्राणांतिक वेदनेने तळमळताना पाहून आणि क्रौञ्चीचा करूण आक्रोश ऐकून महर्षींचा शोक श्लोकरूपात प्रकट होतो.

रामायणकाळात घनदाट अरण्ये होती. जसे चित्रकूट, नैमिषारण्य, दंडकारण्य, पंचवटी, रामाचे अधिकाधिक जीवन वनवासात गेले. युद्धकांडात हनुमंताने संजीवनी नामक वनस्पती आणल्याचे

सर्वविदित आहे. ऋषिमुनी शांतपणे ज्या ठिकाणी तपश्चर्या करून ब्रह्मचिंतन करीत अशी अरण्ये जेव्हा दानवांचे निवासस्थान बनली तेव्हा रामाने दंडकारण्यात प्रवेश केला राक्षसांचे पारिपत्य केले आणि ऋषिमुनींना शांत निसर्गाचा सहवास पुन्हा प्राप्त झाला.

रामायणाचे किष्किन्धा कांड निसर्गवर्णनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रस्रवण पर्वत आणि त्याच्या आसपासच्या रमणीय वातावरणाचे वर्णन करून श्रीराम लक्ष्मणाला म्हणतात,

'अस्यां वस्याम सौमित्रेवर्षरात्रमरिंदम।'

रामायणात अग्नितत्त्वाची देखील देवता मानून, पूजा केली जात असल्याचे निदर्शनास येते. भगवान श्रीराम सुग्रीवाशी अग्निसाक्षीने मैत्री करतात. नित्य आणि गृह्य नामक अग्नीचे वर्णन रामायणात आले आहे.

रामायणात तमसा, गंगा, सरयू, मंदाकिनी, गोदावरी, नर्मदा, तुंगभद्रा, कावेरी इ. नद्यांमध्ये वर्णन तसेच अशोकवाटिका, अयोध्येतील उपवने, मिथिलेतील उपवने, पंपा सरोवरा जवळील उद्यान, लंकेतील उपवन, मधुबन इ. उद्यानांची वर्णने वाचनीय आहेत त्यातून रामायणातील पर्यावरण विषयक ज्ञान प्रकर्षाने जाणवते.

महाभारताच्या आदिपर्वात 'आपोमयाः सर्वरसाः सर्वमापोमयं जगत्।।' म्हणजे सर्व रस जलापासून बनले आहेत. वस्तुतः सर्व जग जलमय आहे. अशी जलतत्वाची महती वर्णन केली आहे.

शांतिपर्वात, असा श्लोक आला आहे की,

वल्ली वेष्टयते वृक्षं सर्वतश्चैव गच्छति।
न ह्यदृष्टश्चैव मार्गोऽस्ति तस्माद् पश्यन्ति पादपा ।। १७७.१३

वृक्षांनाही दृष्टी आहे. वेल वृक्षाला वेढून सगळीकडे जाते मार्ग अदृष्टी नसतो अशा अर्थाचे हे वचन आहे. आश्वमेधिक पर्वात असे वर्णन आहे की –

पुष्पिताः फलवन्तश्च तर्पयन्तीह मानवान्।
वृक्षदं पुत्रवद् वृक्षास्तारयन्ति परत्र च।।

याचा आशय असा की, या जगात फुले आणि फळे देणारी झाडे लोकांना तृप्त करतात आणि वृक्षदान देणाऱ्यांना पुत्राप्रमाणे वृक्ष वैतरणी पार नेतात.

महाभारताच्या अनुशासन पर्वात जलाशयाच्या तटप्रदेशाजवळ वृक्ष लावण्यास सांगितले आहे –

तस्मात्तडागे वृक्षा वै रोप्याः श्रेयोऽर्थिना सदा।
पुत्रवद् परिपाल्यश्च पुत्रास्ते धर्मतः स्मृताः।।

म्हणजेच ज्यांना पारलौकिक कल्याणाची इच्छा आहे, त्यांनी जलाशयाच्या तटप्रदेशात नेहमी वृक्ष लावावे. त्या वृक्षाचे पुत्रांप्रमाणे पोषण करावे ते धर्मतः पुत्र मानले जातात. अनुशासनपर्वातच वनामध्ये अज्ञानवश सुद्धा आग लावणारा ब्रह्मघाती मानला आहे.

लौकिक संस्कृत साहित्य तर पर्यावरणीय संदर्भांनी ओतप्रोत आहे. महाकाव्यात ऋतुवर्णने, निसर्गवर्णने असावीत हा तर महाकाव्यवर्णनाचा मानदंडच आहे. महाकवि कालिदासाची नाटके, महाकाव्ये, निसर्गवर्णनाचे सर्वांगसुंदर नमुने आहेत. त्याची शकुन्तला साक्षात, निसर्गकन्या आहे. वृक्षांना पाणी दिल्याशिवाय जी कधी स्वतः पाणीही पीत नाही. त्याचे मेघदूत तर ठायीठायी निसर्ग वर्णनाचे रमणीय रेखचित्रण! विस्तार भयास्तव या सर्वांचा सविस्तर उल्लेख येथे केला नाही.

'वसुधैव कुटुम्बकम्' ही भावना हृदयाशी कवटाळून वाटचाल करणारी, 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' अशी उदात्त प्रार्थना करणारी भारतीय संस्कृती निसर्गाला आपलाच एक भाग मानते. झाडे लावणे, पाणवठे तयार करणे, प्रदूषण न करणे यांनाही यज्ञ मानले आहे. 'तेन त्यक्तेन भुञ्जीथा' या उक्तीप्रमाणे मानवाने निसर्गाला न ओरबाडता त्याचे रक्षण करीत सुख उपभोगले पाहिजे ही आपल्या ऋषींची अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

१) आर्य सुभाषित साहस्री – रामजी उपाध्याय चौखम्बा सुरभारती प्रकाशन वाराणसी
२) वेदकालीन समाज – शिवदत्त गुप्ता चौखम्बा सुरभारती प्रकाशन वाराणसी

३) भविष्यमहापुराणम् (द्वितीय खंड) – पं. बाबुराम उपाध्याय (अनुवादक) (हिन्दी साहित्य संमेलन प्रयाग)
४) संस्कृत वाङ्मय मे पर्यावरण चेतना – प्रो. उमारानी त्रिपाठी, कला प्रकाशन बी.एन.यु.वाराणसी
५) वेदो मे पर्यावरण संरक्षण –anantajournal.com
६) वेदो पर्यावरण चिंतन, चिंता, चेतावनी –https://hindiindiawaterportal.org.
७) वेदो मे पर्यावरण संतुलन का महत्त्व –https://hindiindiawaterportal.org.
८) भारतीय दर्शन मे पर्यावरण विमर्श –https://www,sieallahabad.org
९) वेदकाल –https://vihwakosh.marathi.gov.in
१०) रामायणातील निसर्ग आणि माणूस –https://writatopic.com article
११) रामायण मे प्रकृति पर्यावरण विचार – डॉ.मणिभूषण मिश्र अभिषेक प्रकाशन दिल्ली
१२) महाकवि कालिदासांच्या साहित्यातील पर्यावरण संरक्षण –https://oldhistoricity.lipword
१३) यजुर्वेद वाङ्मय में पर्यावरण का स्वरूप –www.divyayug.com
१४) वेदातील पर्यावरण–https://www.mahamtb.com
१५) पुराणो मे पर्यावरण संरक्षण –https://www.jefir.org